**ठळक बातम्या**

- भारताचं जीवाश्मेतर इंधनातून ५० टक्के वीजनिर्मितीचं उद्दिष्ट निर्धारित मुदतीच्या पाच वर्ष आधी पूर्ण

- केंद्र सरकार लवकरच प्रधानमंत्री कुसुम योजनेचा दुसरा टप्पा सुरू करणार

- भारतीय अंतराळवीर शुभांशु शुक्ला आज दुपारी 3 वाजता पृथ्वीवर परतणार

- गुंतवणूकदारांची फसवणूक करणाऱ्यांविरोधातली शिक्षा आणि दंडाची रक्कम वाढवण्याचं मुख्यमंत्र्यांचं विधानसभेत आश्वासन

**आणि**

- गणपती उत्सवाकरता महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या पाच हजार जादा गाड्या

**<><><><>**

भारतानं ऊर्जा निर्मितीच्या क्षेत्रात नवा टप्पा गाठला आहे. जीवाश्मेतर इंधनातून वीजनिर्मितीचं ५० टक्के उद्दिष्ट निर्धारित मुदतीच्या पाच वर्ष आधीच पूर्ण केलं असून भारताची एकूण वीजनिर्मिती क्षमता ४८४ गिगावॅट असून, त्यापैकी २४२ गिगावॅट वीजनिर्मिती सध्या जीवाश्मेतर इंधनाच्या माध्यमातून होत आहे. त्यामुळे स्वच्छ आणि पर्यावरणपूरक ऊर्जेबाबत भारतानं केलेला निश्चय प्रत्यक्षात येत असल्याचं स्पष्ट झालं आहे. नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांनी ही घटना ऐतिहासिक असल्याचं समाजमाध्यमावर म्हटलं आहे. २०३० या वर्षापर्यंत जीवाश्मेतर इंधनाच्या वापरातून ५० टक्के वीजनिर्मितीचं उद्दिष्ट ठेवण्यात आलं होतं. मात्र २०२५ मध्येच ते साध्य झालं असून, प्रत्येक भारतीयासाठी हे अभिमानास्पद आहे, असंही त्यांनी नमूद केलं.

**<><><><>**

प्रधानमंत्री कुसुम योजनेला राजस्थान, गुजरात आणि मध्य प्रदेशात मिळालेल्या यशानंतर आता केंद्र सरकार लवकरच प्रधानमंत्री कुसुम योजनेचा दुसरा टप्पा सुरू करणार असल्याची घोषणा नवीन आणि नवीकरणीय उर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांनी केली आहे. ते आज आयआयटी मुंबई इथे आयव्हीसीए नवीकरणीय ऊर्जा शिखर परिषदेत बोलत होते.

**- होल्ड बाईट- प्रल्हाद जोशी -**

नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रातल्या गुंतवणूकदारांनी सौर, पवन आणि जैव इंधनांपासून वीजनिर्मितीसाठी दिलेल्या पाठिंब्यामुळे हे शक्य झाल्याचंही जोशी यावेळी म्हणाले. भारताचं स्वच्छ ऊर्जा परिवर्तन हे केवळ पर्यावरणाच्या दृष्टीनं नाही तर ते एक राष्ट्रीय ध्येय आहे. नवीकरणीय ऊर्जा क्षमता वाढीमध्ये भारत आता जागतिक स्तरावर अव्वल तीन देशांमध्ये येतो. त्यामुळे २०३०पर्यंत आपल्या सरकारचं ५०० गिगावॅट जीवाश्मेतर इंधन क्षमतेचं लक्ष्य साध्य करण्यासाठी खासगी गुंतवणूक महत्त्वाची ठरेल, हेही जोशी यांनी यावेळी अधोरेखित केलं.

**<><><><>**

भारतीय अंतराळवीर ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला आणि त्यांचे सहकारी आज भारतीय प्रमाणवेळेनुसार दुपारी ३ वाजता पृथ्वीवर परतणार आहेत. कॅलिफोर्निया नजीकच्या समुद्रकिनाऱ्यालगत त्यांचं यान उतरणार आहे. परत आल्यानंतर हे अंतराळवीर पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाशी जुळवून घेण्यासाठी विलगीकरणात राहतील. शुक्ला यांनी आपल्या मुक्कामात भारताच्या दृष्टीनं महत्त्वाचे असणारे सात सूक्ष्म गुरुत्वाकर्षणविषयक प्रयोग केले आहेत. परतीच्या प्रवासाआधी शुक्ला यांनी सर्वांशी संवाद साधला. अंतराळातून दिसणारा भारत आजही अंतराळवीर राकेश शर्मा यांनी ४१ वर्षांपूर्वी म्हटल्याप्रमाणे ‘सारे जहाँसे अच्छा’ असल्याचं शुक्ला म्हणाले.

**<><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू ओडिशाच्या दौऱ्यावर असून आज त्या कटक इथं रवेनशॉ विद्यापीठाच्या १३ व्या दीक्षांत समारंभाला उपस्थित होत्या. विद्यापीठाचा वैभवशाली इतिहास आणि शिक्षणक्षेत्रातल्या नेत्रदीपक कामगिरीचं त्यांनी कौतुक केलं. रवेनशॉ कन्याशाळेच्या तीन इमारतींच्या पुनर्विकास कामाची पायाभरणी करणार आहेत. १५ व्या शतकातले महान ओडिया कवी आणि विचारवंत सरला दास यांच्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात राष्ट्रपती सहभागी होणार असून, कलिंगरत्न पुरस्कारांचं वितरण त्यांच्या हस्ते होणार आहे. हा दौरा आटोपून राष्ट्रपती संध्याकाळी नवी दिल्ली इथं परततील.

**<><><><>**

ओडिशातल्या बालासोर मध्ये एका महाविद्यालयीन विद्यार्थिनींनं प्राध्यापकानं केलेल्या दुष्कृत्यामुळे आत्मदहनाचा प्रयत्न केला. ९५ टक्के जळलेल्या या मुलीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल या विद्यार्थिनीच्या पालकांची भेट घेऊन या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं. पोलिसांनी आरोपीसह, महाविद्यालयाच्या प्राचार्यांनाही ताब्यात घेतलं आहे.

**<><><><>**

परराष्ट्र मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी आज बीजिंगमध्ये चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग आणि एससीओ, अर्थात शांघाय सहकार्य संघटनेच्या इतर सदस्यांची भेट घेतली. डॉ. जयशंकर आपल्या दोन दिवसांच्या चीन दौऱ्यासाठी काल बीजिंग मध्ये पोहोचले. ते आज तियानजिन शहरात होणाऱ्या शांघाय सहकार्य संघटनेच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीला उपस्थित राहतील. डॉ. जयशंकर यांनी काल बीजिंगमध्ये चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी यांच्या बरोबर द्विपक्षीय बैठक घेतली. चीनकडून हायड्रॉलिक डेटाची तरतूद पुन्हा करण्यासह, सीमापार नद्यांबाबत सहकार्य, प्रतिबंधात्मक व्यापार विषयक उपाययोजना आणि आर्थिक सहकार्यातले अडथळे, हे मुद्दे त्यांनी यावेळी अधोरेखित केले.

भारत, रशिया, इराण, कझाकस्तान, किर्गिस्तान, पाकिस्तान, ताजिकिस्तान, उझबेकिस्तान आणि बेलारूस हे देश शांघाय सहकार्य संघटनेचे सदस्य असून चीनकडे अध्यक्षपद आहे.

**<><><><>**

मोठ्या परताव्याचे अमिष दाखवून गुंतवणूकदारांची फसवणूक करणाऱ्यांविरोधातील शिक्षेची आणि दंडाची रक्कम वाढविण्यात येईल असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत सांगितलं. आर्थिक फसवणुकीच्या गुन्ह्यात संबंधित आरोपी कंपनीची मालमत्ता शोधणं, त्यांचं मूल्यांकन करून खटल्याचा जलद निपटारा करण्यात पोलिसांना मदत करण्यासाठी राज्य सरकार विशेष व्यवस्था निर्माण करेल. यात आर्थिक क्षेत्रातल्या तज्ज्ञांसह मूल्यांकनासाठी खासगी कंपन्यांची मदत घेऊ असंही ते म्हणाले. यासंदर्भात अमोल खताळ यांनी मूळ प्रश्न उपस्थित केला होता. तर, प्रकाश सोळंकी आणि सुधीर मुनगंटीवार यांनी उपप्रश्न केले.

**<><><><>**

जागतिक युवा कौशल्य दिन आज साजरा केला जात असून स्किल इंडिया उपक्रमाचं भारताचं हे दहावं वर्ष आहे. प्रधानमंत्र्यांनी २०१५ मध्ये हा उपक्रम सुरू केला. तरूणांना रोजगार, उद्योजकता आणि शाश्वत उपजीविकेसाठी उद्योगाशी संबधित कौशल्यांनी सुसज्ज करण या उपक्रमाचं मुख्य उद्दिष्ट आहे. यंदाची संकल्पना कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल कौशल्यांद्वारे युवा सक्षमीकरण ही आहे.

**<><><><>**

गणपती उत्सवाकरता कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांच्या सोयीसाठी यंदा राज्यपरिवहन महामंडळ पाच हजार जादा गाड्या सोडणार आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज मुंबईत ही माहिती दिली. गणपती उत्सवाच्या अनुषंगाने मंत्रालयात बोलावलेल्या बैठकीत बोलत होते.

२३ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर दरम्यान मुंबई, ठाणे, पालघर, या विभागांतल्या प्रमुख बसस्थानकातून ही सुविधा उपलब्ध राहील. या गाड्यांचं आरक्षण npublic.msrtcors.com या संकेतस्थळावर तसंच MSRTC Bus Reservation ॲपद्वारे, उपलब्ध होणार आहे. २२ जुलै पासून गट आरक्षणाला सुरुवात होईल.

**<><><><>**

उदयोग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागाने स्टार्टअप इंडिया कार्यक्रमाचा प्रमुख उपक्रम असलेल्या पाचव्या राष्ट्रीय स्टार्टअप पुरस्कारांसाठी अर्ज मागवले आहेत. केंद्रसरकारच्या आत्मनिर्भर भारत आणि पाच ट्रिलियन डॉलर्स अर्थव्यवस्थेच्या उद्दिष्टाला अनुसरून, स्टार्टअप इंडिया हा कार्यक्रम, स्टार्टअप्सना मान्यता देऊन, कर सवलत, नियमन सुलभता, निधीची उपलब्धता आणि क्षमता विकास, यासारख्या उपक्रमांमधून समर्थन देतो, असं वाणिज्य मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><>**

जम्मू मध्ये भगवती नगर यात्री निवास बेस कॅम्पवरून आज सकाळी अमरनाथ यात्रेसाठी आलेल्या ६ हजार ३८८ यात्रेकरूंचा जथा कडक सुरक्षा व्यवस्थेत काश्मीर खोऱ्याकडे रवाना झाला. यापैकी २ हजार ५०१ यात्रेकरू बालताल मार्गे, तर ३ हजार ८८७ यात्रेकरू पहलगाम मार्गे अमरनाथ गुंफांच्या दर्शनासाठी मार्गस्थ होतील.

**<><><><>**

महाराष्ट्राच्या विविध भागात आज सकाळपासून पावसानं जोर धरला असून अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत झालं आहे. मुंबई आणि उपनगरात आज सकाळपासून दमदार पावसानं हजेरी लावली. कोकणातल्या इतर जिल्ह्यांमधेही जोरदार पाऊस होत असून मुंबई गोवा महामार्गावरच्या वाहतुकीवर त्याचा परिणाम झाला आहे.

मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, पुणे आणि सातारा जिल्ह्याच्या घाटमाथा परिसरात आज मुसळधार पावसाची शक्यता असून हवामान विभागानं या ठिकाणी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

**//<><><><>//**